आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता
५ जून २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त देशभर वृक्षारोपण आणि पर्यावरण विषयक कार्यक्रम
- प्रधानमंत्री उद्या जम्मू काश्मीरमधे जगातल्या सर्वात उंचावरच्या रेल्वे पुलाचं उद्घाटन करणार
- अमेरिकेतल्या हार्वर्ड विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांच्या व्हिसावर निर्बंध घालणारी अधिसूचना जारी

  **आणि**

- सिक्कीममधे भूस्खलनामुळे अडकून पडलेल्या ६३ पर्यटकांची सुखरूप सुटका / आसाममधे पूरस्थिती अद्याप गंभीर

**<><><><><>**

देशभरात आज जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जात आहे. पर्यावरण रक्षणाबाबत जागरूकता आणि प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेनं १९७३ मध्ये आजच्या दिवशी सर्वप्रथम हा दिवस साजरा केला होता. हा दिवस १४३ हून अधिक राष्ट्रांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनाद्वारे साजरा केला जातो. ‘प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणावर मात करा’ ही या वर्षीच्या पर्यावरण दिनाची मुख्य संकल्पना आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

पर्यावरणपूरक वर्तनाचा अंगिकार करावा, असं आवाहन **राष्ट्रपतींनी** आपल्या संदेशात केलं आहे.

वसुंधरेच्या कल्याणात मानवाचं हित सामावलेलं आहे हे लक्षात ठेवून प्रत्येकानं पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावं, असं **उपराष्ट्रपतींनी** आपल्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले….

**होल्ड--बाईट--प्रधानमंत्री**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत विशेष वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. प्रधानमंत्र्यांनी यावेळी वटवृक्षाचं रोप लावलं. ही मोहीम अरवली हरित भिंत प्रकल्पाचा भाग आहे. या प्रकल्पात सातशे किलोमीटरच्या अरवली पर्वतरांगांमध्ये पुनर्वनीकरण केलं जाणार आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आपल्या निवासस्थानी शेंदराची रोपं लावली. १९७१ च्या युद्धात शौर्य गाजवणाऱ्या कच्छ आणि गुजरातमधल्या वीरांच्या माता आणि भगिनींनी ही रोपं प्रधानमंत्र्यांना त्यांच्या कच्छ दौऱ्यात भेट दिली होती.

केंद्रीय मंत्री **धर्मेंद्र प्रधान** यांनी आज पर्यावरण दिनानिमित्त नवी दिल्लीत एक पेड माँ के नाम मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री **देवेंद्र फडणवीस** यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी वृक्षारोपण केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या जम्मू काश्मीरच्या दौऱ्यावर जाणार असून, जगातला सर्वात उंचावरच्या रेल्वे पुलाचं -चिनाब पुलाचं ते उद्घाटन करणार आहेत. स्थापत्यशास्त्रातलं आश्चर्य ठरेल असा चिनाब रेल्वे पूल नदीपात्रापासून ३५९ मीटर

उंचीवर आहे, हा एक हजार ३१५ मीटर लांबीचा पूल पोलादी कमानीवर तोललेला आहे. भूकंप आणि सोसाट्याच्या वाऱ्यांना तोंड देण्याच्या दृष्टीने सक्षम केलेला आहे. या पुलामुळे जम्मू आणि श्रीनगरमधील संपर्क आता वाढू शकेल. त्याचबरोबर अंजी या देशातल्या पहिल्या केबल-स्टेड रेल्वे पुलाचं उद्घाटन, तसंच कटरा इथं ४६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पणही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली असून या कार्यकाळात देशातल्या जनतेची आर्थिक क्षमता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्जवला योजना, जन धन योजना आणि आयुष्यमान भारत सारख्या विविध योजना शासनाने सुरू केल्या. या योजनांचा लाभ २५ कोटींहून अधिक जनतेनं घेतला असून देशातल्या पायाभूत सोयीसुविधा आणि स्वावलंबी भारत निर्माण करण्यावर केंद्रसरकार जोर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सामाजिक माध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातली जनगणना एक ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार असल्याचं, केंद्रीय गृहमंत्रालयानं सांगितलं आहे. ही जनगणना दोन टप्प्यात होईल. एक ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू काश्मीर, लडाख, उत्तराखंड, आणि हिमाचल प्रदेशमध्ये जातनिहाय जनगणनेला सुरुवात होईल. तर १ मार्च २०२७ पासून देशातल्या उर्वरित राज्यांमध्ये जनगणना सुरू होईल.

**<><><><><>**

भारताने दहशतवादाविरोधात घेतलेली भूमिकेबद्दल जगाला सांगण्यासाठी गेलेल्या सात शिष्टमंडळांपैकी पाचवं शिष्टमंडळ आज भारतात परतलं आहे. काल यापैकी चार शिष्टमंडळं देशात परतली. संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा तसंच द्रमुक खासदार कन्निमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळांनी आज परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांची भेट घेतली.

काँग्रेस खासदार शशी थरुर यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने अमेरिकेतले अग्रणी, तसंच वरिष्ठ अधिकारी आणि भारतीय समुदायाबरोबर घेतलेल्या बैठकांमध्ये भारताने दहशतवादाविरोधात घेतलेल्या भूमिकेचं जोरदार समर्थन केलं. दहशतवादाविरोधात भारताच्या भूमिकेला देशभरातून एकमुखाने पाठिंबा मिळाल्याचं त्यांनी वॉशिंग्टन डिसी इथं अमेरिकेच्या परराष्ट्र व्यवहार समितीसोबतच्या बैठकीत स्पष्ट केलं. या समितीचे अध्यक्ष ब्रायन मास्ट यांनी दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत अशा प्रवृत्तींना जगात थारा नसल्याची प्रतिक्रिया प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

<><><><><>

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या ७६ किलोमीटरच्या अंतिम टप्प्याचं लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हेदेखील यावेळी उपस्थित असतील. यामुळं आता संपूर्ण ७०१ किमी लांबीचा नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला होणार आहे.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हार्वर्ड विद्यापीठातील परदेशी विद्यार्थ्यांच्या व्हिसावर निर्बंध घालणारी अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेअंतर्गत व्हिसावरील तात्पुरत्या सहा महिन्यांचा निलंबनाची आणि

आवश्यकता वाटल्यास निलंबनाचा कालावधी वाढवण्याची तरतूद आहे. या अधिसूचनेअंतर्गत ट्रम्प प्रशासानानं आपल्या परराष्ट्र विभागाला या अधिसूचनेतील निकषांच्या आधारे हार्वर्डच्या कोणत्याही विद्यमान विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि एक्सचेंज व्हिसा रद्द होऊ शकणार असतील तर ते रद्द करण्याचा विचार करावा असे निर्देशही दिले आहेत.

दरम्यान ट्रम्प प्रशासनाची ही आणखी एक बेकायदेशीर तसंच प्रतिशोध घेणारी कृती असून, यामुळे हार्वर्डला पहिल्या घटनादुरुस्तीअंतर्गत असलेल्या अधिकारांचं उल्लंघन होत असल्याची प्रतिक्रिया  असल्याची प्रतिक्रिया हार्वर्ड विद्यापीठानं दिली आहे. विद्यापीठ यापुढेही आपल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत राहील असंही विद्यापीठ प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

भारतासह जगभरातले हज यात्रेकरु आज सौदी अरेबियातली हज यात्रा करत आहेत. मिना इथे  काल पोचलेल्या या यात्रेकरुंच्या पाच दिवसीय प्रत्यक्ष हज यात्रेची सुरुवात कालच झाली. यात्रेतील ‘हजचा नमाज’ या मुख्य धार्मिक कार्यक्रमाला अराफत मैदानावर यात्रेकरु जमले आहेत. आज दिवसभर या ठिकाणचं नमाजपठण आणि इतर धार्मिक कार्यांमध्ये हज यात्रेकरु भाग घेतील.  उद्या सकाळी हे यात्रेकरु  पुन्हा मिनाला परततील.

**<><><><><>**

बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडीयमजवळ काल झालेल्या चेंगराचेंगरीची निःपक्षपाती चौकशी करण्याचे निर्देश राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी राज्यसरकारला दिले आहेत.  या प्रकाराची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केली आहे.

या दुर्घटनेत मृत्यमुखी पडलेल्यांची संख्या ११ झाली आहे, तर ३३ जण जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

सिक्कीमच्या उत्तर भागात भूस्खलनामुळे अडकून पडलेल्या पर्यटकांना बाहेर काढण्याचं तसंच स्थानिकांना मदत पोहचवण्याचं काम आज आज सकाळी पुन्हा सुरु झालं. पाऊस थांबल्यानंतर आज सकाळी पाक्योंग विमानतळावरून मदत सामुग्री घेऊन ३ हेलीकॉप्टर छातेनकडे रवाना झाली. २ एम आय -१७ हेलिकॉप्टरमधून ६३ पर्यटकांना छातेनमधून पाक्योंग विमानतळावर पोहचवण्यात आलं आहे. यात परदेशी पर्यटकांचा देखील समावेश आहे. पर्यटकांना बागडोगराहून परत आणण्यासाठी १ हेलिकॉप्टर तैनात करण्यात आलं आहे, तर सिलीगुडीपर्यंत पोहचवण्यासाठी राज्य सरकारनं बसेसची सोय केली आहे. आज दुपारपर्यंत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्याचं काम पूर्ण होईल, असा अंदाज आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, दूरसंचार सेवा आणि वीज वितरण विभागाचे कर्मचारी देखील या भागात पोचले असून ते आवश्यक सेवा पुन्हा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

**<><><><><>**

आसाममध्ये संततधार पावसामुळे अनेक भागात पाण्याची पातळी वाढल्याने पूरस्थिती अद्याप गंभीर आहे. राज्यातल्या ब्रह्मपुत्रा, बराक, बुऱ्ही दिहिंग, कोपिली, सोनई, कटखल या नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत.